## प्रकरण दुसरे

# पद्मश्री बाळासाहेब पाटील :
# एक अष्टपैलू संपादक

प्रकरण दुसरे

## पद्मश्री बाळासाहेब पाटील :
## एक अष्टपैलू संपादक

राजर्षि शाहू महाराजांच्या कोल्हापूर नगरीत अनेक ज्ञानवंत, क्रिडापटू, समाजसेवक, सत्यशोधक, पत्रकार, संपादक इत्यादी लोक आपल्या थोर कार्याने पवित्र झाले आहेत. त्यांनी आपल्या जीवनाचा एक आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांच्या या कार्यामुळेच करवीर भूमी ही नवरत्नाची खाण आहे हे कोणालाच नाकारता येत नाही. यामधील एक नवरत्न म्हणजे पद्मश्री पत्रकार, अष्टपैलू संपादक, सत्यवादीकार बाळासाहेब पाटील होय. कोल्हापूरच्या वृत्तपत्रसृष्टीवर सतत ६३ वर्षे अधिराज्य प्रस्थापित करणारे भिष्माचार्य, निर्भिड पत्रकार, पुरोगामी विचाराचे खंदे पुरस्कर्ते आपल्या मृत्युपर्यंत अखंडपणे आपल्या वृत्तपत्रीय कार्याव्दारे बहुजन समाजाच्या अन्यायाला वाचा फोडणारे सामान्य समाजाचे हित डोळयासमोर ठेवून त्यांच्या न्याय हक्कासाठी झगडणारे हाडाचे 'पत्रकार-संपादक-सत्यवादीकर' बाळासाहेब पाटील यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो[1].

एखादया व्यक्तीचे कार्य किंवा व्यक्तीमत्व हे एक किंवा दोन क्षेत्रातच मर्यादित असते. पण काही 'लाखात एखादी' अशी व्यक्तीमत्व असतात कि त्यांच्या सारख्या अष्टपैलू हि-यांनी सर्व दिशा उजळलेल्या असतात. सत्यवादीकारांचे जीवन असेच अष्टपैलू व्यक्तीमत्व असणारे आहे. नाटय, काव्य, किर्तनकार, उत्तम वक्ता, पत्रकार, समाजसेवक, संपादक, इतिहास प्रिय अशा पैलूंनी सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांचे जीवन उजळले आहे. त्यांचे जीवनकार्य आजच्या आधुनिक जगात यशासाठी धडपडणा-या तरुणांना मार्गदर्शक दिव्याप्रमाणे ठरले आहे.

**जन्म, बालपण व शिक्षण -**

सत्यवादीकारांचे गाव कोल्हापूरच्या पूर्वेस २७ मैलावर शिरोळ तालुक्यातील कोथळी हे आहे. वारणा व कृष्णा या दोन नद्यांच्या संगमावर कोथळी गाव असल्याने येथील परिसर रम्य आहे. कोल्हापूर संस्थानात या गावाला अतिशय महत्व होते. कारण पटवर्धन सरदाराकडून कोल्हापूरवर ज्या स्वा-या होत, त्याला प्रथम तोंड देण्याची कामगिरी या गावावर येई. त्यामुळे ऐतिहासिक महत्व या गावाला आहे. अशा या ऐतिहासिक महत्व असणा-या कोथळी मधील एका प्रतिष्ठित पाटील घराण्यात सत्यवादीकारांचा जन्म १९०२ मध्ये झाला.[१] सत्यवादीकारांचे आजोबा हे सरकार दरबारी मोठा मान असणारे एक कर्तबगार व्यक्ती होती. तर वडील एक नामांकित पहिलवान होते. कोथळीच्या पंचक्रोशीत त्यांना 'आमानबापू' पहिलवान म्हणून ओळखले जात असे. तसेच ते एक कृषीतज्ञ म्हणूनही प्रसिध्द होते.

रम्य ते बालपण या नात्याने सत्यवादीकारांचे बालपण लाडात गेले. आपला मुलगा आपल्या वडिलांप्रमाणे कर्तबगार व्हावा अशी इच्छा त्यांच्या वडिलांची होती. परंतु शेती, मळी, जनावरे यांच्याशी दंगामस्ती करण्यात बालपण चालल्यामुळे सत्यवादीकारांचे शिक्षणाचा श्री गणेशा थोडासा उशिराच म्हणजे १९१० मध्ये झाला.

शालेय जीवनात सत्यवादीकार एक अत्यंत हुशार विद्यार्थी होते. त्यांच्या तत्कालिन शाळा तपासनीस- इन्स्पेक्टर काजी यांनी सुध्दा त्यांच्या बुध्दीचातुर्याचे कौतुक केले होते. त्यांचे पाचवी पर्यंतचे शिक्षण कोथळीत झाले. सहावी, सातवीसाठी मात्र त्यांना कृष्णा नदी पोहून सांगलीस जावे लागे. शालेय जीवनात त्यांना मराठी व इतिहास या विषयाची जी आवड निर्माण झाली. ती त्यांच्या अखेरपर्यंत ही आवड कायम राहिली आहे. सातवीनंतर काही अपरिहार्य कारणामुळे त्यांना शिक्षण सोडावे लागले याचे अतिशय दुःख झाले[२]. शाळा सोडल्यानंतर त्यांनी शेतीमध्ये लक्ष घालण्यास सुरुवात केली. सत्यवादीकार लहानपणापासून निर्भिड वयाच्या १५-१६ वर्षापर्यंतच त्यांनी घराण्याला शोभेल अशी घोडसवारी, पोहणे,

कुस्ती यामध्ये प्राविण्य मिळविले होते. बैलगाडी पळविण्याची तर त्यांना भलतीच आवड होती. असेच एकदा बाहुबलीच्या यात्रेवरुन येताना गाडी पळवित असताना गाडी उलटली सर्वजण फरफटले. त्यामुळे वडिल त्यांना घरी आल्यावर फार रागावले. याचा परिणाम त्यांच्या संवेदनक्षम मनावर झाला आणि त्यावेळेपासून त्यांना वाचनाची गोडी लागली. कोथळीमधील ग्रंथालयात त्यावेळी जागरुक, विजयी मराठा, दीनमित्र, प्रगति जिनविजय इ. वृत्तपत्रे येत होती. त्याचे आवडीने व अभ्यासपूर्वक वाचन सत्यवादीकार करीत. त्यामुळे कोथळीचे वाचनालय हेच त्यांचे खरे ज्ञानपीठ बनले. या त्यांच्या अभ्यासपूर्ण वाचनामुळेच त्यांना अनेक विषयाची माहिती झाली व वाचनामुळे साहित्य निर्मिती करण्यास लागणारी प्रतिभा ही यानंतर उमटू लागली.

**साहित्य सेवा -**

वाचनाचा चांगला परिणाम सत्यवादीकाराच्या मनावर झाला. त्यांनी विद्यार्थी दशेतच साहित्य सेवेला प्रारंभ केला. 'परोपकारी चंदन' हे त्यांनी लिहिलेले पहिले काव्य होय. हे काव्य त्यांनी प्रगति-जिनविजय कडे पाठविले ते पहिल्या पानावर छापूनही आले. यावेळी सत्यवादीकारांना झालेला आनंद अवर्णनीय होता. त्यानंतर त्यांनी अनेक कविता लिहिल्या. देवभोळेपणावर प्रकाश टाकणारे 'मिथ्यावलीला' हे त्यांनी विद्यार्थी दशेतच लिहिलेले प्रहसन वजा नाटक होय. मित्रांच्या साहय्याने त्यांनी या नाटकाचा प्रयोगही गावातच केला.[४] अशाप्रकारे साहित्य शुभारंभ झाला. दै. सत्यवादीसारखे वर्तमानपत्र हाती आल्या वर ही सत्यवादीकारांची प्रतिभा अशीच फुलत राहिली व यामधून अनेक साहित्यीक ग्रंथ उमलत गेले.

१९३१ मध्ये त्यांनी अस्पृश्यता निवारण्याकामी सहकार्य करणारे 'तरुणांचे बंड' हे नाटक लिहले. या नाटकाचा प्रथम प्रयोग ही पॅलेस थिअटरमध्ये लक्ष्मी विलास नाटय मंडळाने छत्रपती राजाराम महाराजांच्या वाढदिवसानिमित्य साजरा केला. हे नाटक यावेळी अतिशय गाजले. अनेक वृत्तपत्रांनी व व्यक्तींनी सत्यवादीकारांचे हे नाटक लिहल्याबद्दल अभिनंदन

केले. त्यांनी हे जातीव्यवस्थेवर टीका करणारे नाटक लिहून राष्ट्रकार्याला हातभार लावला आहे असा गौरव विश्वबंधूने ६ सप्टेंबर १९३१ च्या अंकात केला होता.[५]

'तरुणाचे बंड' हे नाटक सत्यवादीकारांची अस्पृश्य उध्दाराची तळमळ सांगणारे आहे. तसेच त्यांनी सर्कस जीवनावरील लिहलेली 'सर्कस मोहीनी कांदबरी, प्रतिभेतील प्रेमप्रवाह ही कांदबरी 'गावचा देव' ही प्रदीर्घ कथा सर्व साहित्य साहित्यातील उच्च दर्जाचे आहे. १९६६ मध्ये सत्यवादीकाराचे 'जीवन चक्र' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले. या आत्मचरित्राबद्दल गौरव करणारे अनेक मान्यवरांचे अभिप्राय सत्यवादीकारांना आले. यशवंतराव चव्हाण यांनी सुध्दा या आत्मचरित्राबद्दल गौरव उद्गार काढले[६]. १९६७ मध्ये सत्यवादीकारांनी 'सुदर्शन' हा एका ध्येयवादी पत्रकाराच्या जीवनावर बोलपट काढला. १९६७ मधील सर्वोत्कृष्ठ ध्येयवादी बोलपट म्हणून त्याचा सर्व ठिकाणी गौरव झाला. या बोलपटाची कथा व गीते सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांनी लिहली होती[७].

सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांचा मूळ पिंड कवीचा होता. सत्यवादी पत्र काढण्यापूर्वी 'कवी बळवंत' या टोपण नावाने त्यांच्या कविता नियतकालिकातून प्रसिध्द होत. 'सुदर्शन' चित्रपटातील गीते ही त्यांचीच होती. याशिवाय अनेक भक्ती गीते, राष्ट्रगीते, विकास गीते, प्रणय गीते त्यांनी लिहली. तसेच भगवान महावीराचा पोवाडाही त्यांनी रचला होता. त्यांच्या गीताना रसानुकूल चाली लावून अनेक समारंभात श्री अरविंद पोवार आणि पार्टी सादर करीत असे तर पोवाडा गायन शाहीर सर पिराजीराव सरनाईक हे करत.[८] अनंत व्यापातून सत्यवादीकार साहित्य लिखाणासाठी कसा वेळ काढत असत हे आश्चर्यच आहे. त्यांच्या साहित्य लेखनाचा प्रभाव त्यांच्या संपादकीय कारकिर्दीवर पडला आहे. सत्यवादीसाठी ललित साहित्य नेहमी उच्च दर्जाचे निवडले जाई याला कारण सत्यवादीकारांची साहित्यीक दृष्टी होय. याशिवाय साहित्य कसे असावे यावर मार्गदर्शन करणारे अनेक अग्रलेख त्यांनी

सत्यवादीतून प्रकाशित केले. त्यांच्या या लिखाणावरुन त्यांचे साहित्या विषयीचे विचार किती उच्च दर्जाचे होते हे समजते.

**निर्भिड पत्रकार -**

'प्रगती व जिनविजय' हे दक्षिण महाराष्ट्र जैन सभेचे मुखपत्र होते. ते महिन्यातून दोन वेळा प्रसिध्द होई. त्यांचे संपादक श्री बी. बी. पाटील हे होते. त्यांनी १९२४ मध्ये सत्यवादीकारांनर सांगलीस 'प्रगती' साठी बोलावून घेतले. यापूर्वी सत्यवादीकार 'विजयी-मराठां' चे बातमीदार म्हणून काम करीत होते[९]. सांगलीस प्रगतीच्या सहसंपादकाचे आणि व्यवस्थापकाचे काम सत्यवादीकार करु लागले. यावेळी सांगली हा दक्षिण महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा बालेकिल्ला होता. कारण सांगलीली श्री. आण्णासाहेब लठ्ठे, श्री. भास्करराव जाधव, प्रबोधनकार ठाकरे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर हे वारंवार येत व या ठिकाणी त्यांची भाषणे होत. सांगलीला प्रेस ॲक्ट जारी असल्याने वर्तमानपत्रे फक्त नव्हती. 'प्रगती' कडे काम करतानाच सत्यवादीकारांना बहुजन समाजवादी नेत्यांशी चांगला परिचय होवू लागला. सत्यवादीकारांचे विचार मुळातच बंडखोर, सुधारणावादी जहाल विचारसरणीचे होते. असले विचार जैन समाजातील सनातनी लोकांना आवडत नव्हते. सत्यवादीकारानां जैन धर्मातील 'बुवाबाजी' आवडत नव्हती. याचा परिणाम म्हणजे सत्यवादीकारांना 'प्रगती- जिनविजय' कडे काम करणे अशक्य झाले. त्यांनी प्रगती साठी काम करणे सोडले. परंतु जन्मभर पत्रकार राहण्याचा त्यांचा निश्चय होता. या निश्चयामुळे सत्यवादीकारांनी स्वतःचे पत्र काढावयाचे ठरविले. त्याप्रमाणे सातारा जिल्हयातील 'कुपवाड ' हे प्रकाशन स्थळ निश्चित करुन २१ मे १९२६ रोजी 'सत्यवादी' चा पहिला अंक काढला[१०] व सत्यवादीकारांनी आपला निश्चय पूर्ण केला.

पत्रकार हा समाजाचा एक महत्वाचा घटक असतो. अनेक राजकिय आंदोलने, सामाजिक चळवळ यशस्वी करण्यात पत्रकाराचा सिंहाचा वाटा असतो. पत्रकार जर निर्भिड असेल तरच तो सत्याचा पाठपुरावा करु शकतो. वृत्तपत्र यशस्वी होणे अथवा न होणे हे संपादका इतकेच पत्रकारावर अवलंबून असते. पत्रकाराला प्रत्येक विषयाचे ज्ञान असले पाहिजे. राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद तर मुखोद्‌गत हवा. सर्व पत्रकारांचे गुण सत्यवादीकारांच्या अंगी केवळ नव्हतेच तर हाडामांसात मुरले होते. तसे पाहिले तर सत्यवादीकारांचे शिक्षण ही फारसे झाले नाही. परंतु त्यांची पत्रकारिता पाहिली कि किमान ते व्दिपदवीधारक असावेत असे वाटते. सत्यवादीकरांच्या बद्‌दल लिहताना आचार्य अत्रे सुध्दा लिहतात कि 'सत्यवादीकार हे जन्मजात पत्रकार आहेत त्यांच्या सारखे तपस्वी पत्रकार जुन्या जमान्यातही फार थोडे आढळतील. पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य असते तर महाराष्ट्राच्या वृत्तपत्र व्यवसायात त्यांनी क्रांती करुन दाखविली असती'.'' आचार्य अत्रे यांचे सत्यवादीकारां विषयीचे विचार अत्यंत सार्थ आहेत.

**खास अंकाचे राजे -**

सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांना वृत्तपत्र क्षेत्रातील 'खास अंकाचे राजे' ही पदवी यथार्थ आहे. कारण सत्यवादीकारांनी जितके खास अंक प्रकाशित केले तितके खास अंक मराठीतील कोणत्याही वृत्तपत्राने केले नसतील. 'खास अंक' हे सत्यवादीकारांच्या संपादकीय कौशल्याचे एक गौरवास्पद वैशिष्टये आहे. योग्य वेळी योग्य विषयाचा 'खास अंक' काढण्यामध्ये संपादकाची कर्तव्यतत्परता जरुरीचे असते. सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांनी खास अंक काढताना अहोरात्र परिश्रम घेऊन योग्य वेळेत अंक काढण्यामध्ये फार मोठी कामगिरी केली आहे.

'सत्यवादी' च्या पहिल्याच वर्षी 'श्री आण्णासाहेब लठ्ठे खास अंक' काढला. लठ्ठे व सत्यवादीकारांचा वैयक्तीक संबंध काहीही नव्हता. परंतु केवळ लठ्ठे बहुजन समाजाचे शिल्पकार म्हणून सत्यवादीकारांनी हा अंक काढण्याचा प्रपंच केला. या अंकातून आण्णासाहेब लठ्ठे यांच्यावर पुण्याच्या वृत्तपत्रातून टीका होत होती. त्याचा समाचार घेण्यात आला आहे. या अंकात आण्णासाहेब लठ्ठे यांची कुंडली व जीवनचरित्र दिले आहे. आण्णासाहेब लठ्ठे यांच्या जीवनावर निघालेला सत्यवादीचा हा एकमेव अंक आहे[१२]. दुस-या वर्षी सत्यवादीचा 'उत्साह अंक' काढला सत्यवादीकारांच्या वृत्तपत्रीय कार्यातील उत्साहाचे प्रतीक म्हणून हा अंक काढला. सत्यवादीचे एक हितचिंतक व सांगलीतील प्रागतिक पक्षाचे पुढारी श्री. विनायकराव माईणकर (वकील) ३० नोव्हेंबर १९२७ रोजी मृत्यु झाला. त्यांना श्रध्दांजली वाहणारा 'माईणकर खास अंक' ९ जानेवारी १९२८ रोजी काढला. याचवर्षी 'विधवा विवाह पुरस्कार खास अंक' काढला[१३]. हा अंक सत्यवादीकारांच्या पुरोगामी विचाराचा निशाणी ठरला. १९२८ मध्ये विधवा विवाहाचा पुरस्कार करणे किती धाडसाचे असेल याचा विचार आज करणे अशक्य आहे. १९२८ मध्येच सत्यवादीकारांनी 'राजर्षि शाहू खास अंक' काढला. महाराष्ट्रात बहुजन समाजात झालेली आजची जागृती राजर्षि शाहू महाराज झाले नसते तर ही जागृती झाली नसती. तेंव्हा त्या दृष्टीने राजर्षि शाहू चे थोर कार्य वाङ्.मय रुपाने जनतेसमारे ठेवणे हाच मुख्य उद्देश सत्यवादीकरांचा होता[१४]. या अंकावरुन सत्यवादीकारांचा बहुजन समाजाशी असणारी निष्ठा लक्षात येते.

खास अंक काढण्याच्या बाबतीत सत्यवादीकार कधी डगमगले नाहीत. १९३४ मध्ये खास अंकाची त्यांनी कमाल मर्यादा गाठली. या एकाच वर्षी पाच खास अंक काढून 'खास अंकाचे राजे' ही पदवी यथार्थ असल्याचे सिध्द केले. यावर्षी सिनेमासृष्टीची माहिती देणारा 'सिनेमा खास अंक' एकनाथ महाराजांच्या जीवनावरील

'धर्मात्मा' बोलपटाची निर्मिती झाली. त्यामुळे 'धर्मात्मा खास अंक' हा एकनाथ महाराजांची महती सांगणारा अंक, सावकारी पाश या चित्रपटाचे अवलोकन करणारा 'सावकारी पाश खास अंक' तसेच 'शकुंतला खास अंक' ही याच वर्षी या सर्वांवर कळस करणारा 'बुवाबाजी खास अंक' हा ४ एप्रिल १९३४ रोजी काढण्यात आला[१५]. बुवाबाजी फक्त धर्मात चालते असा सर्वसामान्य समज असतो. परंतु हया गैरसमजाला 'बुवाबाजी खास अंक' काढून सत्यवादीकारांनी सुरुंग लावला. या अंकात महाराष्ट्रीय राजकारणातील बुवाबाजी, चित्रपट सृष्टीतील बुवाबाजी, सुशिक्षित स्त्रियामधील बुवाबाजी, डॉक्टर- वकिलाची बुवाबाजी, बायकांच्या नावावर येणारे बुवा, खेडेगावात गाजणारे बुवा, कॉमरेड बुवा इत्यादी विविध क्षेत्रातील बुवाबाजी स्पष्ट केली आहे. या अंकास व्ही. डी. कुलकर्णी, आण्णासाहेब लठ्ठे, चि. रा. टिकेकर, मनोरमाबाई खाबडे, शामराव ओक, प. स. देसाई, गोपाळकृष्ण, रावब एन. एम. हकीम, इत्यादी मान्यवरांचे लेख लाभले. याच अंकात बुवाबाजीवर कायदयाचे नियंत्रण कसे असावे. बुवाबाजी संदर्भात समाजाचे काय कर्तव्य आहे. लोकांनी बुवाबाजी नष्ट करण्यास कशा प्रकारे कार्य करावे याविषयी चर्चा केली आहे[१६]. या अंकाची पाने ४६ होती हा खास सत्यवादीकारांच्या निर्भिड पत्रकारतेचा व झुंजार संपादकत्वाचा निदर्शक आहे.

ऑगष्ट १९४० मध्ये 'दक्षिण संस्थाना खास अंक' काढण्यात आला. दक्षिण संस्थानाची माहिती सांगणारा हा अंक १५० पानांचा आहे. यामध्ये कोल्हापूरसह फलटण, औंध, सांगली, इंचलकरंजी या संस्थानापासून ते सोंडूर पर्यंत अनेक संस्थानाची माहिती छायाचित्रांसह या अंकात देण्यात आली आहे. हा अंक तयार करण्यास सत्यवादीकारांना सहा महिने लागले. कारण त्यांनी प्रत्येक संस्थानाची माहिती तेथे जाणून घेतली आहे. हा अंक पाहून रावब दादासाहेब सुर्वे इतके खुष

झाले व सत्यवादीकारांना म्हणाले की, "महाराष्ट्रात खास अंक काढावा तुम्हीच तुमचा हात धरणारा दुसरा कोणी नाही".[17] असा दक्षिण संस्थाना खास अंक १९४६ मध्येही काढण्यात आला होता. १९४४ साली दुसरे महायुध्द थांबताच सत्यवादीकारांनी 'औद्योगिक खास अंकाची' घोषणा केली. महायुध्दामुळे कागद अतिशय महाग व दुर्मिळ होता तरीही हा अंक मोठया रॉयल आकाराचा १६० पानाचा असून १०० वर चित्रे आहेत. औद्योगिक विकासाला पूरक ठरणारे असे माहितीपूर्ण लेख या अंकात आहेत. या अंकासाठी सत्यवादीकारांनी अनेक अधिकारी तज्ञ यांची मदत घेतली. हा अंक तयार करण्यास आठ महिने लागले. ८ जानेवारी १९४५ रोजी मुंबई येथे या अंकाचे प्रकाशन झाले[18]. राष्ट्रीय उद्योगधंदयाची माहिती देणारा हा खास अंक म्हणजे सर्व खास अंकाचा मुकूटमणी होय.

१५ ऑगष्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु झाले. अशा उचित समयी राष्ट्रीय सरकारला पाठिंबा देण्यासाठी सत्यवादीकारांनी 'पंडित नेहरु खास अंकाची' घोषणा केली. या अंकाच्या छपाईचा प्रारंभ २५ जुलै १९४८ रोजी आण्णासाहेब लठ्ठे यांच्या हस्ते झाला व २ सप्टेंबर १९४८ मध्ये त्याचे प्रकाशनही झाले. मराठी भाषेतील एकमेव असामान्य ग्रंथ म्हणजे सत्यवादीचा 'पंडित नेहरु खास अंक' होय. हा अंक १७५ पानाचा असून पंडित नेहरुचे जीवन कार्य, त्यांचे कुटुंब नेहरु वाड्.मयाचा परिचय, गांधी-नेहरु, पटेल-नेहरु, जनाब जीना व नेहरु, परराष्ट्रीय लेखकांच्या भाषेतील नेहरु असे अनेक लेख नेहरुंच्या कार्याचा गौरव करणारे आहेत[19]. या अंकांची किंमत २ रु. होती. परंतु वर्गणीदारांना तो १ रुपयात दिला जात असे. स्वातंत्र्योत्तर काळात देशाची प्रगती होवू लागली अशा वेळी धरणे व पाटबंधारे हा भारताच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे असे सांगणा-या 'धरणे पाटबंधारे खास अंका' चे २६ मार्च ५३ रोजी कोल्हापूरचे

जिल्हाधिकारी डॉ. ए. यु. शेख यांच्या हस्ते प्रकाशन केले. या अंकात धरणे पाटबंधारे यांचे महत्व भारतातील पावासाचे प्रमाण, भारतातील कोणत्या नदीवर कोठे धरणे बांधता येतील याची माहिती देण्यात आली होती. निरनिराळया धरणाची छायचित्रे होती. त्यामुळेच या अंकाचे विधानसभेच्या अध्यक्षाकडून ही स्वागत झाले[१०]. हा अंक म्हणजे धरणे पाटबंधारे या विषयावरील सूचीग्रंथच होता.

योग्य वेळी खास अंक काढणे हे संपादकाचे कौशल्य असते. हे कौशल्य सत्यवादीकारांमध्ये सतत दिसून येते. याचे उदाहरण म्हणजे भारतावर चीनने आक्रमण केल्यानंतर देशाचे स्वातंत्र्य रक्षण करण्यास प्रोत्साहन देणारा 'शौर्य साहस खास अंक', १९६५ मध्ये पाकिस्तान आक्रमणाच्या वेळी 'भारत रक्षा-श्रुतिका खास अंक' हे अंक अत्यंत प्रेरणा दायी आहेत. १९३८ मध्ये सत्यवादीकारांना 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला यावेळी ते दिल्लीला गेले होते. पुरस्कार स्विकारण्यासाठी दिल्लीला गेले तरी त्यांची पत्रकार दृष्टी कार्यरत होती. त्यामुळेच त्यांनी तेथून आल्यावर 'दिल्ली खास अंक' काढला. या अंकात दिल्लीचा इतिहास प्राचीन कालापासून ते १९६८ पर्यंतचे वर्णन केले आहे[११]. हा खास अंक म्हणजे भारतातील पाच हजार वर्षातील संस्कृती, धर्म व इतिहास सांगणारा संदर्भ ग्रंथ होय. २०६ पान संख्या असणा-या या अंकात १०० पेक्षा अधिक चित्रे देण्यात आली आहेत व किंमत फक्त ३ रुपये होती.

१९७४ मध्ये राजर्षि शाहू जन्मशताब्दी साजरी होत असताना शाहूच्या कार्याचा गौरव करणारा 'राजर्षि शाहू खास अंक', इंदिरा गांधी यांच्या विचारांचा व ध्येयधोरणाचा पुरस्कार करणारा 'इंदिरा गांधी विचारदर्शन खास अंक' हा १९७० मध्ये काढला. याशिवाय १९४६ मधील 'स्त्री शक्ती खास अंक', 'सिनेमा खास अंक', 'म. गांधी खास अंक', 'बडोदा खास अंक', 'पर्यटन खास अंक', 'जीवन विकास खास अंक' इत्यादी शेकडो खास अंक हे सत्यवादीकारांच्या अष्टपैलू संपादकत्वाचे

साक्षीदार आहेत. दसरा दिवाळी, गुढीपाडवा या हिंदु सणानिमित्त काढलेल्या विशेषांकाखी तर गणतीच होवू शकत नाही. एकदंर या खास अंकाचा अभ्यास करता एक महत्वाची गोष्ट लक्षात येते कि सत्यवादीकारांची दूरदृष्टी किती तेजस्वी होती. तसेच त्या विषयातील तज्ञ लोकांचे सहाय्य घेण्यामागे त्यांचे सपादक कौशल्य ही दिसून येते. त्यांच्या या कार्यामुळेच ते 'खास अंकाचे राजे' बनले.

**किर्तन व वक्तृत्व -**

किर्तनाच्या माध्यमातून पुरोगामी विचारांचा प्रचार करण्याचे धोरण सत्यवादीकारांनी ठरविले व त्याप्रमाणे जैन समाजातील एक प्रसिध्द कितर्नकार तात्यासाहेब चोपडे यांचा आर्दश नजरेसमारे ठेवून सत्यवादीकारांनी पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सातारा अशा अनेक ठिकाणी 'अष्कलंक-निष्कलंक' या आख्यानापासून ते 'राष्ट्रमाता जिजाई' पर्यंत अनेक राष्ट्रीय विषयावर किर्तने रंगविली[२२].

किर्तनाप्रमाणेच सत्यवादीकारांचे वक्तृत्व हे अगदी प्रभावी होते. त्यांनी मद्रास राज्यातील सोंडूर पासून गुजराथमधील बडोदयापर्यंत व कोकणातील रत्नागिरी पासून पूर्वेला विजापूर पर्यंत अनेक विषयावर शेकडो व्याख्याने दिली. त्यांच्या वक्तृत्व कलेची दखल आकाशवाणीने घेतली होती. त्यांचे आकाशवाणीवर पहिले व्याख्यान 'कर्मवीर विठ्टल रामजी शिंदे' या विषयावर झाले होते. १२ ऑगष्ट १९६१ रोजी मल्लविदयेचे मनोहर दर्शन घडविणारे 'भारतीय मल्ल व मल्लविदया' या विषयावरील भाषण मुंबई नभोवाणीवरुन प्रक्षेपित झाले[२३]. सत्यवादीकारांना कोल्हापूरविषयी अतिशय अभिमान होता. 'आमचा गाव कोल्हापूर' या विषयावरील भाषण १९ जून १९७३ रोजी रात्री ९.१५ वाजता पुणे, सांगली व परभणी नभोवाणी केंद्रावरुन प्रक्षेपित झाले. त्यावेळी त्यांनी राजर्षि शाहू स्वराज्य संस्थापिका ताराबाई, कोल्हापरची कुस्ती

परंपरा, ऊस पीक, साठमारी या विषयी अत्यंत अभिमानाने माहिती दिली आहे[२४]. त्यांच्या या व्याख्यानावरुन त्यांची गौरवास्पद वक्तृत्व कला दिसते.

**सामाजिक कार्य -**

पत्रकार, वक्ता, किर्तनकार या बरोबरच सत्यवादीकार एक जन्मजात समाजसेवक होते. ज्या समाजात आपण जन्माला आलो त्याचे काही तरी देणे लागतो याची जाणीव त्यांना होती. त्यांनी आपल्या सामजिक कार्याची सुरुवात जैन सभेच्या प्रचार कार्यापासून केली. ते सत्याचे उपासक असल्यामुळे सत्यशोधक समाजामार्फत ज्या चळवळी कोल्हापूरात होत त्यामध्ये ही सहभागी झाले. पत्रकार अथवा संपादक आपल्या वर्तमानपत्रातूनच एखादया कार्याचा पुरस्कार करतो असे नाही तर स्वतः तो ते कार्य करुन समाजाला आपला आदर्श निर्माण करु शकतो याचे उदाहरण म्हणजे त्यांची अस्पृश्य उध्दाराची चळवळ होय.

निर्भिडकार अनंतराव गद्रे यांनी महाराष्ट्रात सहभोजनाची चळवळ सुरु केली. आचार्य अत्रे ही यामध्ये होते. या सहभोजन चळवळीत सत्यवादीकारांनी भाग घेऊन या त्रिमूर्तीने संपूर्ण महाराष्ट्रात ही या चळवळीची व्याप्ती वाढविली[२५]. ज्या वेळी सहभोजनात भाग घेतला त्यावेळी त्यांच्यावर जाती बहिष्कार टाकण्याचा निर्णय कोथळीमधील जैन समाजाने घेतला. सत्यवादीकारांचे जैन समजाविषयी असणारे पुरोगामी ठाम विचार व त्यांच्या मातोश्रीची खंबीर भूमिका यामुळे या जाती बहीष्काराचा कोणताच परिणाम झाला नाही. मात्र यानंतर त्यांनी ही चळवळ अतिशय गतिमान केली. तसेच त्यांनी अस्पृश्य परिषदाही आयोजीत करुन यशस्वी केल्या.

सत्यवादीचे संपादक असताना त्यांनी राजकारणात कोठेही प्रत्यक्ष सहभाग घेतला नाही. राजकारणापासून ते अलिप्त राहिले. मात्र राजकिय पक्षाची ध्येय धोरणे,

पुढा-यांची भाषणे, पं. नेहरु, इंदिरा गांधी यांची धोरणे यांना सत्यवादीत नियमित अग्रस्थान दिले. स्थानिक स्वराज्यात मात्र त्यांचा सहभाग होता. १९३३ मध्ये त्यांची नगरपालिकेत सभासद म्हणून नेमणूक झाली होती. १९२४ मध्ये इलाखा पंचायतीवर सरकारतर्फे निवड झाली. १९३९ मध्ये करवीर इलाखा पंचायतीच्या व्हॉईस प्रेसीडेंटच्या जागी नेमणूक झाली होती. त्यावेळी ते नगरपालिकेचे सभासद ही होते. तसेच काही काळ त्यांनी इलाखा पंचायतीचे ऑडीटर म्हणून काम केले होते[२६]. नगरपालिकेत ते १९४५ पर्यंत होते. १९४५ मध्ये नगरपालिकेचे अध्यक्ष श्री माने होते. श्री माने यांचा फोटो नगरपालिकेत लावण्यास त्यांनी विरोध केला व या प्रकरणातून सभासदत्वाचा राजीनामा दिला[२७]. यावरुन त्यांची सत्यनिष्ठा समजते. १९३३ ते १९४५ ही स्थानिक स्वराज्यातील कामगिरी अतिशय चांगली पार पडली आहे.

**स्वराज्य संस्थापिका ताराबाई चरित्र - एक वेड -**

करवीर राज्य संस्थापिका ताराबाई यांचे चरित्र हे सत्यवादीकाराचे वेड होते. तिचा पराक्रम, अलौकीक कतृत्व यांचे गुणगान करणे हा सत्यवादीकारांचा स्थायी स्वभाव होता. महाराणी ताराबाई वर त्यांनी प्रंचड लेखन केले. तसेच त्यांच्या कार्यावर असंख्य व्याख्याने व किर्तनेही त्यांनी केली. सत्यवादीच्या अनेक अग्रलेखातून कोल्हापूरात त्यांचे भव्य स्मारक व्हावे म्हणून जनतेला जाहीर विनंती केली आहे. १९३३ मध्ये सत्यवादीचा ‘स्त्री शक्ती खास अंक’ काढला. या अंकात ताराबाईचे संपूर्ण चरित्र दिले आहे. १९३० मध्येही ‘ताराबाई खास अंक’ काढला होता. याशिवाय १९६४ मध्ये माधवराव शिंदे व शंकरराव बागल यांनी लिहलेली ताराबाई जीवनचरित्रावरील लेखमालाही सत्यवादीतून प्रकाशित केली. १९६६ च्या ‘स्त्री खास अंकात’ ताराबाईचा इतिहास लिहताना या लेखमालेचा व डॉ. ब्रिजकिशोर

यांच्या 'ताराबाई अँन्ड हर टाईम्स ' या ग्रंथाचा संदर्भासाठी त्यांनी उपयोग केला आहे.[२८]

१७ फेब्रुवारी १९८१ रोजी कोल्हापूरच्या पूर्व प्रवेशव्दारावर १६ फुट उंचीच्या ताराराणीच्या भव्य अश्वारुढ पुतळयाची प्रतिष्ठापना केली व या दिवशी महाराष्ट्राचे राज्यपाल ना. ओ. पी. मेहरा यांच्या शुभहस्ते पुतळयाचे अनावरण झाले. या भव्य स्मारकामुळे सत्यवादीकारांची ५० वर्षापासूनची तळमळीची इच्छा पूर्ण झाली. यावेळी झालेल्या समारंभात श्री. शंकरराव कौलवकर यांनी आपल्या भाषणात ''सत्यवादीकारांनी ताराराणीस जीवंत ठेवले '' असे गौरव उद्‌गार काढले[२९]. दैनिक सत्यवादीचे अंक पाहताना शंकरराव कौलवकर यांच्या उद्‌गाराची प्रचिती येते. इतक्या प्रचंड कालखंडात ताराराणीचा निष्ठेने गौरव करणा-या सत्यवादीकारांना ताराराणीच्या चरित्राचे खरोखर वेड होते. डॉ. ब्रिजकिशारे यांच्या 'ताराबाई अँन्ड हर टाईम्स' या ग्रंथाबद्‌दल शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागतील प्रमुख प्रो. डॉ. म.दा. नलवडे यांच्या बरोबरही सत्यवादीकारांनी चर्चा केली होती[३०] व या ग्रंथाचे सत्यवादीतून परीक्षणही केले होते. आपल्या संपूर्ण आयुष्यात ताराराणीच्या कार्याचे गौरव करण्यात सत्यवादीकारांची लेखणी व वाणी अग्रेसर होती ताराराणीचा भव्य अश्वारुढ पुतळा उभारुन कोल्हापूरची वेश शोभायमान केली. तसेच सत्यवादीकारांच्या अथक प्रयत्नांने कोल्हापूरच्या व्हीनस चौकात कोल्हापूरच्या त्यागी छत्रपती राजाराम महारांजाचाही पुतळा उभा राहिला आहे[३१].

**सत्सवादीकारांचे मानसन्मान, गुणगौरव -**

ज्या समाजाने सत्यवादीकारांना जाती बहिष्काराचा प्रयत्न केला त्याच जैनसमाजाने १९३२ मध्ये श्री क्षेत्र बाहुबली येथे पहिले मानपत्र दिले. त्यानंतर अनेक ठिकाणच्या नागरिकांनी मानपत्रे देऊन त्यांचा गौरव केला आहे. १९५८ मध्ये मुंबई

A
13613

सरकारने सत्यवादीकाराची ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक केली होती[३२]. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव भारत सरकारने १९५९ मध्ये पुणे आकाशवाणी केद्रांच्या सल्लागर समितीवर नियुक्ती करुन केला होता.[३३] १९६३ मध्ये सत्यवादीकरांची सर्वत्र एकसष्टी साजरी केली. यावेळी त्यांचे अनेक ठिकाणी सत्कार सोहळे झाले. त्यांच्या आजोळी वसगडे या गावी ग्रामस्थांनी एकसष्ठी साजरी करताना त्यांना महावस्त्रे देऊन ‘पत्रपंडीत’ ही त्यांच्या पत्रकार-संपादक जीवनाचा गौरव करणारी पदवी दिली. पुण्यातील जैन समाजाकडून त्यांना ‘आचार्य’ ही पदवी दिली[३४].

सत्यवादीकारांचे कार्य तसे महान होते. सामाजिक क्षेत्रातील कार्याबरोबरच पत्रकारीतेच्या दृष्टीनेही त्यानी केलेले कार्य अलौकीक आहे. त्यांच्या अग्रलेखातून त्यांचे कुशल संपादकत्व दिसून येते. अशा महान पत्रकाराचा भारत सरकार गौरव का करणार नाही? १९६८ मध्ये सत्यवादीकारांना भारत सरकारकडून ‘पद्मश्री’ हा बहुमान देण्यात आला. सर्व मानसन्मान गौरव यामध्ये या बहुमानाने मानाचा तुरा त्यांच्या शिरपेचात खोवला गेला. १६ एप्रिल १९६८ रोजी दिल्ली येथे राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार सत्यवादीकारांना देण्यात आला[३५]. या पुरस्कारानंतर वर्षभर सत्यवादीकारांचे सर्वत्र सत्कार सोहळे होत होते. कोथळीमध्ये २५ बैलजोडया असणा-या बैलगाडीतून सत्यवादीकारांची मिरवणूक काढली.

भारत- रशिया मैत्रीचे सत्यवादीकार हे पुरस्कर्ते होते. सत्यवादीच्या अनेक अग्रलेखातून त्यांनी भारत-रशिया मैत्रीचा पुरस्कार केला. या त्यांच्या कार्याचा गौरव म्हणजे त्यानां १९७१ मध्ये मिळालेले सोविएत लॅन्डचे नेहरु पारितोषिक देण्यात आले[३६]. हे पारितोषिक मुंबई येथे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु श्री टोपे यांच्या हस्ते देण्यात आले. दीड हजार रुपये व पदक असे या पारितोषिकाचे स्वरुप होते. सत्यवादीकारांनी पदक स्वीकारले व दीड हजार रुपयांचा चेक भारत-पाकिस्तान युध्दात

मरण पावलेल्या वीर जवानांच्या कुटुबिंयाना मदत करण्यासाठी दिला. हे सत्यवादीकारांच्या देशप्रेमाचे प्रतिक आहे.

**निधन -**

सत्यवादीकारांचे कार्य अतिशय महान आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी मुंबई दूरचित्रवाणीने २० डिसेंबर १९८७ रोजी 'प्रतिभा आणि प्रतिमा' या कार्यक्रमात रविवारी सकाळी ८.१५ वाजता त्यांची मुलाखत प्रसिध्द केली. या मुलाखतीमध्ये सत्यवादीकारांनी आपल्या वृत्तपत्रीय जीवनाचे सिंहावलोकन करीत, वृत्तपत्र व्यवसायाचे मानंदड, चित्रपट, जातीय निर्मुलन यासंबधी विचार मांडले आहेत[३७]. या मुलाखती मध्ये शाहू कॉलेजचे प्रा. श्रीधर हेरवाडे व सत्यवादीचे कार्यकारी संपादक राजकुमार पाटील यांचाही सहभाग होता.

दुर्देवाने या मुलाखतीमधून महाराष्ट्राला आदल्या दिवशी दर्शन दिले व दुस-या दिवशी २१ डिसेंबर १९८७ रोजी या पत्रकार महर्षीने या जगाचा निरोप घेतला[३८]. त्यांच्या मृत्युने मराठी वृत्तपत्र सृष्टीतील एक निर्भिड पत्रकार, झुंजार-संपादक, सत्यान्वेषी समाजसेवक हरविला. ' बहुजन हिताय !, बहुजन सुखाय!' हे सत्यवादीचे ब्रीद वाक्य शब्दशः सत्यवादीकारांनी आपल्या कर्तृत्वाने खरे केले. त्यांच्याविषयी लिहताना भारताचे गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी लिहले आहे कि, 'पुण्या मुंबईबरोबरच आपल्या स्वतःच्या मालकीचे दैनिक पत्र पत्रकार चालवू शकतो हे बाळासाहेबांनी 'दैनिक सत्यवादी' यशस्वी रित्या चालवून सिध्द केले आहे'. त्यांचे चरित्र हेच आजच्या पत्रकार, समाजसेवक, संपादक, राजकीय पुढारी यांना मार्गदर्शक आहे.

## संदर्भ


१. ॲड. आडगुळे महादेवराव - पद्मश्री पत्रकार बाळासाहेब पाटील (लेख) कोल्हापूरची मोठी माणसे- संपादक- भिकशेठ ज्ञानदेव पाटील, पृ. २३२.

२. पाटील बा. आ. - जीवनचक्र, पृ. ४.

३. संपादक, प्रा. हेरवाडे श्रीधर, सत्यवादीकार पद्मश्री बाळासाहेब पाटील पत्रकारिता हिरक महोत्सव (१९२४-१९९४), पृ. ५.

४. कित्ता, पृ. ५.

५. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २७ सप्टेंबर, १९३१, पृ.१.

६. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १५ सप्टेंबर, १९६६, पृ. १.

७. दै. सत्यवादी, कोल्हापूर, ४ जानेवारी, १९६८, पृ. १.

८. दै. सत्यवादी, सुवर्ण महोत्सव खास अंक, १९७५, पृ. २३९.

९. प्रा. हेरवाडे श्रीधर, उ.नि. पृ. ७.

१०. पाटील बा.आ. उ.नि., पृ. २६.

११. प्रा. हेरवाडे श्रीधर, उ.नि. पृ. १०६.

१२. पाटील बा.आ., उ.नि. पृ. ७.

१३. कित्ता- पृ. २८.

१४. दै. सत्यवादी, सुवर्ण महोत्सव खास अंक, १९७५, पृ. ४९.

१५. दै. सत्यवादी, 'बुवाबाजी खास अंक', ४ एप्रिल, १९३८, पृ. १.

१६. कित्ता

१७. दै. सत्यवादी, सुवर्ण महोत्सव खास अंक, १९७५, पृ. ५८.

१८. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १० जानेवारी, १९४५, पृ. ७.

१९. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १ सप्टेंबर, १९४८, पृ. ३.

२०. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १३ एप्रिल, १९५३, पृ. १.

२१. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १५ ऑगस्ट, १९६८, पृ. २.

२२. प्रा. हेरवाडे श्रीधर, उ.नि., पृ. ९.

२३. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १५ ऑगस्ट, १९६१, पृ. ३.

२४. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २० जून, १९७३, पृ. ३.

२५. चव्हाण शिवाजीराव - कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी कोल्हापूर दर्शन - (संपादक) भिडे जी.आर. व देशपांडे पी.एल. पृ. ४०५.

२६. दै. सत्यवादी, कोल्हापूर, १२ जुलै, १९३९, पृ. ४.

२७. पाटील बा.आ., उ.नि. पृ. ६९.

२८. दै. सत्यवादी, कोल्हापूर, 'स्त्री शक्ती खास अंक', १९६६, पृ. ४.

२९. प्रा. हेरवाडे श्रीधर, उ.नि., पृ. ६६.

३०. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २७ डिसेंबर, १९८७, पृ.२.

३१. ॲड. आडगुळे महादेवराव, उ.नि., पृ. २३६.

३२. प्रा. हेरवाडे श्रीधर, उ.नि., पृ. १३.

३३. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २५ मार्च, १९५९, पृ. २.

३४. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २५ एप्रिल, १९६८, पृ. १.

३५. दै. सत्यवादी, कोल्हापूर, ६ नोव्हेंबर, १९७१, पृ. १.

३६. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २१ डिसेंबर, १९८७, पृ. १.

३७. दै. सत्यवादी, कोल्हापूर, २२ डिसेंबर, १९८७, पृ. १.